नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसुचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत.
(शुद्धीपत्रक पुणे महानगरपालिका)

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन शुद्धीपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०१(६)/का-१४११,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०२६.**

<u>वाचा</u> :- नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७२(१४)/का.१४११, दि.३०.१०.२०२५.

**<u>प्रस्तावना:-</u>**

विषयांकित योजनेच्या वाचा येथील शासन निर्णयान्वये फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, जि.पुणे अंतर्गत विकास कामांसाठी रु.५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांची मान्यता रद्द करुन पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सुधारित कामांस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धीपत्रक:-**

उपरोक्त वाचा येथील शासन निर्णयान्वये फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, जि.पुणे अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विकासकामांची मान्यता रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी पुणे महानगरपालिका क्षेत्रातील खालीलप्रमाणे रु. ५.०० कोटी किमतीच्या सुधारित विकासकामांस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कामांची कार्यान्वयीन यंत्रणा **“सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे”** राहील.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | आंबेगाव येथील श्रीकृष्ण मंदिर, श्रीराम मंदिर, श्री.साई मंदिर, श्री.वाघजाई माता मंदिर, श्री.जैन मंदिर जवळील रस्ते तसेच शिवराय कॉलनी, लिपाने वस्ती जवळील रस्ते व ड्रेनेज लाईन करणे ता.हवेली जि.पुणे | २००.०० |
| २ | उंड्री येथील गोदरेज प्राणा सोसायटी जवळील रस्ता तसेच पिसोळी, येवलेवाडी, गुजर निंबाळकर वाडी भागातील विविध ठिकाणी अंतर्गत रस्ते व ड्रेनेज लाईन करणे ता.हवेली जि.पुणे | १५०.०० |
| ३ | आंबेगाव येथी आंबेगाव बुद्रुक व आंबेगाव खुर्द भागातील शनी नगर, सिध्दिविनायक सोसायटी, गणेश कॉलनी, वाघजाई नगर, धबाडी भागातील रस्ते व ड्रेनेज लाईन विषयक व इतर विकास कामे करणे ता.हवेली जि.पुणे | १५०.०० |
| | **एकूण** | **५००.००** |

२. या शासन शुध्दीपत्रकान्वये मंजूर करण्यात आलेल्या कामांसाठी जिल्हाधिकारी, पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. (१) व (४) येथील शासन निर्णयांमधील अन्य सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (महानगरपालिका) परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची

कामे करणे या योजनेअंतर्गत करावयाच्या विकास कामांसाठी निधी आहरित करुन संवितरीत करण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे हे नियंत्रक अधिकारी व सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

३. या कामांसाठी होणारा खर्च हा “मागणी क्र.ओ-९, ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाई व अभिहस्तांकन, (०१)(०१), नागरी स्थानिक संस्थांना (महानगरपालिका) सहायक अनुदान (३६०४ १००९) (कार्यक्रम), ३१,सहायक अनुदान" या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ करिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. या संदर्भातील इतर अटी व शर्ती वाचा येथील शासन निर्णयाप्रमाणे लागू राहतील.

५. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२६०२२६१२५६५८३०१६ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI

Digitally signed by CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT,
2.5.4.20=B99D7DCA0E63BE1BD1B7158B9523537DCC1D46BC807768647A9ED4FF3816ECF3, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=A75E4CF904B78F2AE051843EA1BA6106A393C2B0CF60FE03C945913B2BAE935F, cn=CHARUSHILA DEVENDRA CHAUDHARI
Date: 2026.02.26 12:58:48 +05'30'

**(चारुशीला चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग.
२. जिल्हाधिकारी, पुणे.
३. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
४. जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे.
५. मुख्याधिकारी, फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, जि.पुणे.
६. सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे.
७. मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११. वित्त विभाग, व्यय-८/कोषा प्रशासन-५/अर्थसंकल्प-१६, मंत्रालय, मुंबई,
१२. निवड नस्ती (का-१४११), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.